महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | Rs.2/- | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

शुक्रवार ❖ १३ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १६८ ❖ पाने - ४ | RNI NO : MAHMAR/2016/72091 | Postal Reg. No. THC/256/2022-2024

## संपादकीय

### देवा भाऊ, हे काम कराच !

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री पद पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस यांनी स्वीकारले आहे. मावळते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारली आहे. एकनाथ शिंदे यांच्या मुळे ठाणे जिल्ह्याला राज्याच्या इतिहासात प्रथमच मुख्यमंत्री आणि आता उपमुख्यमंत्री पद मिळाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजितदादा पवार यांचे मनापासून अभिनंदन!

देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार या तिघांनी गेल्या अडीच वर्षात पायाला भिंगरी लावून राज्यभर दौरे करून विकास कामांचा सपाटा लावला आहे. विकासकामे करतांनाच समाजहिताच्या नवनवीन योजना जाहीर केल्या आणि त्यांची अमलबजावणी सुद्धा दमदारपणे केली आहे. त्यातील काही योजनांना सर्वसाधारण कर भरणाऱ्या नागरिकांचा विरोध आहे. नागरिकांना फुकट काही देण्यापेक्षा त्यांच्या हातांना काम द्यावे अशी या कर भरणाऱ्या नागरिकांची मागणी आहे आणि ती योग्य सुद्धा आहे. याचे कारण सर्वसामान्य नागरिकांना फुकट दिल्याने त्यांना सरकार एक प्रकारे आळशी बनवत असल्याची काहींची भावना आहे. त्यांना फुकट देतांना त्याचा भुर्दंड कर भरणाऱ्यांवर पडतो हे वास्तव आहे.

केंद्र सरकारच्या अखत्यारीत असलेल्या रेल्वे प्रशासनाने ज्येष्ठ नागरिक, स्वातंत्र्य सैनिक, पत्रकार आदी विविध घटकांना लांब पल्ल्याच्या गाड्यांच्या प्रवासी भाड्यामध्ये सवलती दिल्या होत्या. मात्र जागतिक महामारी करोनाच्या निमित्ताने रेल्वे प्रशासनाने या सर्व सवलती बंद केल्या आहेत. या बहुतेक सर्व सवलती आजही बंद आहेत. करोनानंतर आता बहुतेक सर्व व्यवहार सुरळीत सुरु झाले आहेत. रेल्वे प्रशासनाने अनेक गाड्या वाढवल्या आहेत आणि वाढवत आहेत. मात्र विविध घटकांना असलेल्या सवलती आजही बंद आहेत. या सर्व सवलती लवकरात लवकर सुरु कराव्यात अशी आग्रही मागणी यानिमित्ताने करीत आहे. किमान ज्येष्ठ नागरिकांच्या आणि पत्रकारांच्या सवलती तरी तातडीने सुरु कराव्यात ही आग्रही मागणी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी घनिष्ट नाते आहे. फडणवीस यांनी आमची ही मागणी मनावर घेऊन शक्य तितक्या लवकर पूर्ण करावी ही आग्रहाची विनंती या माध्यमातून करीत आहे.

पूर्वी रेल्वेचे स्वतंत्र महामंडळ होते. रेल्वेचा स्वतंत्र अर्थसंकल्प असे. मात्र नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यानंतर रेल्वेचा स्वतंत्र अर्थसंकल्प न मांडता केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पातच रेल्वेचा समावेश करण्यात येत आहे. त्याचे धोरण आणि ध्येय काय आहे ते त्यांनाच माहित. त्यात चर्चा करण्याचा आजचा विषय नाही. कोरोनाची महामारी सुरु झाली. लांब पल्ल्याच्या आणि उपनगरी गाड्या करोनाच्या सुरुवातीच्या काळात पूर्ण पणे बंद होत्या. करोनाचा प्रादुर्भाव कमी होत गेला तशा लांबपल्ल्याच्या आणि उपनगरी गाड्या सुरु झाल्या. सुरुवातीला लांबपल्ल्याच्या गाड्या सुरु करताना सर्वच गाड्या या विशेष सुपरफास्ट म्हणून चालवण्यात येऊ लागल्या आणि गाड्या जुन्या असल्या तरी भाडे मात्र सुपरफास्टच्या नावाखाली जादा आकारण्यात येत आहे. एक प्रकारे रेल्वे प्रशासन सर्वसामान्य नागरिकांची पिळवणूक करीत आहे.

आता सर्व काही सुरळीत सुरु झाले असले तरी रेल्वे प्रशासनाने बहुतेक सर्व सवलती अजूनही सुरु केल्या नसल्याने प्रवाशांची लूट म्हणा किंवा पिळवणूक म्हणा सुरु ठेवली आहे. या विषयावर जास्त कोणी आवाज उठवलेला जाणवत नाही. या विषयावर आवाज उठवल्यावर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी लोकसभेच्या अधिवेशनात पोटतिडिकीने प्रश्न मांडला होता. त्याच्या बातम्या सुद्धा आल्या. मात्र अजूनही सवलती सुरु झालेल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

या विषयी काही घटकांशी अनौपचारिक चर्चा केली असता असे लक्षात आले आहे की रेल्वे प्रशासनाला ज्येष्ठ नागरिकांकडून प्रवासी भाड्यामधून जास्त उत्पन्न मिळते. कारण ज्येष्ठ नागरिक रेल्वेच्या लांबपल्ल्याच्या गाड्यांमधून मोठ्या प्रमाणात प्रवास करीत असतात. याच मुद्द्यावर आज पुन्हा लिहीत आहे. ज्येष्ठ नागरिक प्रवास करीत असतात ही वस्तुस्थिती आहे. आणि ही वस्तुस्थिती लक्षात आणून देण्याचा हा प्रयत्न आहे. सर्वसाधारण नागरिक म्हणजे आजचे ज्येष्ठ नागरिकांच्या बाबतीत म्हणतो, हे नोकरी व्यवसायात असतांना मनात असूनही बहुदा फिरू शकले नाहीत. याची करणे अनेक आहेत. त्यातील महत्वाचे म्हणजे नवरा बायको दोघेही नोकरी करून आपला संसाराचा गाडा चालवत असत. संसार करतांना अर्थार्जन करणे आणि मुलांना शिकवून मोठे करणे ही महत्वाची जबाबदारी या नागरिकांना पार पाडावी लागली आहे.

आज हे ज्येष्ठ नागरिक नोकरी व्यवसाय यातून निवृत्त झाल्यावर त्यांना पर्यटन आणि अन्य कारणांसाठी फिरण्यासाठी थोडा कुठे वेळ मिळाला तर करोना आला. त्यामुळे घरात बसून रहावे लागले आहे. करोना संपल्यावर पर्यटनासाठी हे ज्येष्ठ नागरिक घरा बाहेर पडू लागले. मात्र प्रत्येकाला मनात असूनही आर्थिक बाबींमुळे रेल्वे मध्ये सवलत मिळत नसल्याने पर्यटनाचा विचार सोडावा लागत आहे.

ज्येष्ठ नागरिकांना रेल्वेने म्हणजे लांब पल्ल्याच्या गाडीने जाण्याचे आणखी महत्वाचे कारण म्हणजे कुटुंबात सुखाचे किंवा दुःखाचे प्रसंग येत असतात. अशा प्रसंगाला घरातील मुलं किंवा मुली इच्छा असूनही जाऊ शकतीलच असे नाही. रजा न मिळणे, घरात लहान मुलांच्या शाळा कॉलेज अथवा अन्य आणखी कारणांमुळे ही मुले रजा घेऊन अशा प्रसंगांना जाऊ शकत नाहीत. मग सुखाचा किंवा दुःखाच्या प्रसंगांना घरातील वडीलधारी व्यक्ती म्हणून ज्येष्ठ नागरिकांना रेल्वेने प्रवास करावाच लागतो. सवलत मिळो अथवा न मिळो. अशा परिस्थितीत ज्येष्ठ नागरिकांना उत्पन्न नसते किंवा पेन्शन असले तरी ते घर संसार चालविण्यासाठी हातभार लावावा लागतो. त्यात औषधांचा खर्च वाढत असतो. अशा परिस्थितीत ज्येष्ठ नागरिक ज्या वेळी रेल्वेने लांब पल्ल्याच्या गाडीने प्रवासासाठी निघतो त्यावेळी प्रत्येक जण रेल्वेने पूर्वी सारखी सवलत कधी सुरु करणार हाच प्रश्न मनात विचारत असतो. काही संघटना या साठी पाठपुरावा करीत असतात. मात्र त्यांना मर्यादा आहेत.

व्यवसायाचे एक महत्वाचे तत्व आहे. पूर्वी कल्याणच्या पुढे अंबरनाथ, बदलापूर, कर्जत, टिटवाळा आसनगाव आणि पुढच्या भागातील नागरिकांना मुंबई येथे टेलिफोन करावयाचा असल्यास ट्रँक कॉल करावा लागत असे. हा विभाग एकाच क्षेत्रात आणण्यासाठी तत्कालीन खासदार प्रकाश परांजपे यांनी केंद्रीय दळणवळण, नगरविकास आणि अर्थखात्याच्या अधिकाऱ्यांच्या झालेल्या महत्वपूर्ण बैठकीत एक मुद्दा मांडला होता. तो म्हणजे या सर्व भागातून त्यावेळीस मध्य रेल्वेच्या उपनगरी गाडीने रोज प्रवास करणाऱ्यांची संख्या सुमारे एक ते दिड लाख होती. यात महिला प्रवासी मोठ्या प्रमाणात होत्या. खासदार प्रकाश परांजपे यांनी या वरिष्ठ अधिकाऱ्यांना एक महत्वाची सूचना केली. आपण या सर्व भागाचा लोकल म्हणून समावेश करावा. यामुळे रोज कामावर जाणाऱ्या महिला किंवा अन्य घटक दिवसातून ट्रँककॉल करताना मर्यादेत बोलत असत. जर हे लोकल झाले तर ते सर्व अमर्याद फोनवर बोलतील. त्यामुळे टेलिफोन खात्याच्या उत्पन्नात आमूलाग्र वाढ होईल. हा प्रयोग वर्षभर करावा. आणि त्यातून जर उत्पन्न वाढले नाही तर पुन्हा ट्रँक कॉल पद्धत लागू करावी. मात्र मला खात्री आहे, की उत्पन्न ताबडतोब वाढ होईल असे खासदार प्रकाश परांजपे यांनी ठामपणे आपला मुद्दा मांडला होता. या अधिकाऱ्यांनी एका महिन्यातच खासदार प्रकाश परांजपे यांना सांगितले की आपण केलेल्या सूचनेची अमलबजावणी केल्याने उत्पन्न कैक पटीने वाढले आहे. मुद्दा हाच आहे. आज रेल्वेने विविध घटकांतील प्रवासी भांड्यातील सवलती बंद केल्याने सवलती मिळणारे घटक अगदी महत्त्वाचेच असले तर प्रवासासाठी निघत आहेत. या सर्व सवलती पुन्हा सुरु केल्यास रेल्वेचे उत्पन्न कैक पटीने वाढू शकेल. लोकप्रतिनिधींनी या सर्व सवलती पुन्हा पूर्वी प्रमाणे सुरु करण्यासाठी पुढाकार घेऊन सवलती मिळवून दिल्यास हे सर्व घटक या लोकप्रतिनिधींना मनापासून आशीर्वाद देतील. यासाठीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घ्यावा ही कळकळीची विनंती करीत आहे.

पत्रकारांच्या सवलती सुद्धा रेल्वे प्रशासनाने अद्याप सुरु केल्या नाहीत ही अतिशय खेदाची आणि निषेधार्ह बाब आहे. पत्रकारांना निवृत्ती नसते आणि निवृत्ती वेतन सुद्धा नसते. त्यांना कामानिमित्त जास्त आणि पर्यटनासाठी कमी फिरावे लागत असते. त्यामुळे रेल्वे मध्ये सवलत मिळत नसल्याने प्रत्येक वेळी जादा पैसे आकारून तिकीट काढावे लागते आणि पदरमोड करावी लागते. रेल्वे प्रशासनाने पत्रकाराना देण्यात येणाऱ्या सवलती तातडीने सुरु कराव्या ही सुद्धा अतिशय महत्वाची आग्रही मागणी करीत आहे.

मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार यांनी जबाबदारी स्वीकारली असल्याने सर्वसाधारण नागरिकांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. त्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार यांना शारीरिक, मानसिक, आर्थिक, संघटनात्मक, वैचारिक शक्ती प्राप्त होवो हीच यानिमित्ताने शिवचरणी प्रार्थना !

# ‘एक देश, एक निवडणूक’ विधेयकाला कॅबिनेटची मंजुरी



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

**नवी दिल्ली:** भारतीय राजकारणात गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने चर्चेचा विषय ठरलेल्या ‘एक देश, एक निवडणूक’ विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्याची महत्त्वाची माहिती समोर आली आहे. काही दिवसांपूर्वीच माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या नेतृत्त्वाखालील समितीने ‘वन नेशन, वन इलेक्शन’ संदर्भातील अहवाल तयार केला होता.

### संसदेत सादर होणार विधेयक

या अहवालात ‘एक देश, एक निवडणूक’ विधेयकाच्या बाजूने शिफारस करण्यात आली होती. त्यामुळे यंदाच्या हिवाळी अधिवेशनात ‘एक देश, एक निवडणूक’ विधेयक संसदेत सादर केले जाईल, अशी चर्चा होती. त्यानुसार आता केंद्रीय मंत्रिमंडळाने या विधेयकाला मंजुरी दिली असल्याची माहिती समोर आली आहे. आता हे विधेयक लोकसभा आणि राज्यसभेत मांडले जाईल. दोन्ही सभागृहांची मंजुरी मिळाल्यानंतर या विधेयकाला कायद्याचे रुप प्राप्त होईल. त्यामुळे आता एनडीए सरकार ‘एक देश, एक निवडणूक’ विधेयक संसदेत कधी मांडणार, याची उत्सुकता सर्वांना लागली आहे. दरम्यान, पुढील आठवड्यात हे विधेयक मंजुरीसाठी

पान ४ वर ▶▶

## दिल्ली भेटीनंतर उद्या मंत्रीमंडळ विस्तार?

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

मुंबईः राज्यात विधानसभा निवडणुका होऊन आणि निकाल लागून आता अनेक दिवस झाले आहेत, त्यामुळे संपूर्ण राज्याचं लक्ष आता राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार कधी पार पडतो, याकडे लागले आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल (बुधवारी) रात्री दिल्लीत भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांसोबत मंत्रिमंडळ विस्ताराबाबत चर्चा केल्याची माहिती आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रात्री उशिरा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी मंत्रिमंडळ विस्ताराबाबत चर्चा केली



असल्याची माहिती आहे. तर भाजपला किमान २३ मंत्रिपदे हवी असून, सध्या तरी त्यांच्याकडून २५ मंत्रिपदांची मागणी केली जात आहे. शिवसेनेला १३ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला ९ ते १० मंत्रिपदे मिळण्याची शक्यता आहे. फडणवीसांची अमित शहांशी रात्री उशिरापर्यंत चर्चा करण्यात आली. यावेळी भाजपचे पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा उपस्थित होते. हिवाळी अधिवेशनाच्या आधी खातेवाटप होणार असल्याची चर्चा असली, तरी प्रत्यक्षात शनिवारी शपथ घेणाऱ्या मंत्र्यांवर हिवाळी अधिवेशनानंतर विविध खात्यांची जबाबदारी सोपवण्यात येणार असल्याचं बोललं जात आहे. मंत्रीमंडळ विस्तारासाठी आता १४ डिसेंबरचा मुहूर्त असल्याच्या चर्चेने आमदारांची धाकधूक वाढली आहे. त्याचबरोबर काही नेत्यांना डच्चू मिळण्याची शक्यता असल्याने आता सर्वांचं लक्ष मंत्रीमंडळ विस्ताराकडे लागलं आहे. आमदार अब्दुल सत्तार यांना मंत्रिमंडळात घेण्यासाठी भाजपकडून विरोध करण्यात आला आहे. शिवसेनेतील काही आमदारांनीही सत्तार यांच्या नावाला विरोध केल्याची माहिती आहे. डॉ. तानाजी सावंत, माजी मंत्री संजय राठोड यांनाही सत्तेत सामील करून घेण्यास भाजपचा विरोध आहे. शिंदे मात्र सावंत यांच्या समावेशाबाबत आग्रही आहेत. सावंत यांनी आरोग्यमंत्री म्हणून उत्तम काम केले असल्याचे त्यांनी भाजपला सांगितले आहे.

महायुती सरकारमध्ये शिवसेनेच्या वाट्याला येणाऱ्या मंत्रिपदे पाहता पुन्हा जुन्या चेहऱ्यांना संधी देण्याऐवजी नव्या चेहऱ्यांचा समावेश करावा, अशी चर्चा

पान ४ वर ▶▶

## बदलापूरमधील वायु गळती टिनकोच्या दोन कर्मचाऱ्यांवर गुन्हा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूरः** बुधवारी रात्री मोठ्या प्रमाणावर पसरलेल्या नायट्रोजन डायॉक्साईड या वायूमुळे बदलापुरातील हजारो नागरिकांना त्रास जाणवला. याप्रकरणी बदलापूर औद्योगिक वसाहतीतील टिनको केमिकल या कंपनीच्या दोन कर्मचाऱ्यांवर निष्काळजीपणाचा ठपका ठेवत बदलापूर पूर्व पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या कंपनीत खत , कीटकनाशक आणि रसायने तयार केली जातात.

बदलापूर पूर्वेतील औद्योगिक वसाहतीमध्ये टिनको केमिकल ही कंपनी आहे. या कंपनीत बुधवारी रात्रीच्या सुमारास रासायनिक प्रक्रिया करत असताना योग्य ती खबरदारी घेतली गेली नाही. त्यामुळे येथून नायट्रोजन डायॉक्साईड हा वायू मोठ्या प्रमाणावर पसरला, अशी माहिती बदलापूर पूर्व पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण बालवडकर यांनी दिली आहे. निष्काळजीपणा केल्याप्रकरणी नित्यानंद बोरा आणि प्रशांत शाहू अशा दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती बालवडकर यांनी दिली आहे. बुधवारी रात्री अचानक संपूर्ण बदलापूर शहरात नायट्रोजन डाय-ऑक्साइड पसरल्याने एकच खळबळ उडाली होती. हवेचा गुणवत्ता निर्देशांक या काळात ३१४ पर्यंत पोहोचला होता. तर नायट्रोजन डायॉक्साईड वायूचा निर्देशांक एका तासात ३२५ पर्यंत पोहोचला होता. मोठ्या प्रमाणावर नायट्रोजन डायॉक्साईड हवेत पसरल्याने हजारो नागरिकांना त्रास जाणवला.

## कल्याण ग्रामीणमधील पाणीप्रश्न सुटणार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**- प्रतिनिधी**

कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील १४ गावं आणि २७ गावांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांना भेडसावणारा पाणीपुरवठ्याचा प्रश्न लवकरच सुटणार आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट खासदार डॉक्टर श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, नवनियुक्त आमदार श्री. राजेश गोवर्धन मोरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या शिष्टमंडळाने आज एमआयडीसी विभागाचे सीईओ व सदस्य सचिव श्री. पी. वेलारासू यांची भेट घेतली.

सदर बैठकीत १४ गावं आणि २७ गावांमधील पाणीपुरवठ्याच्या समस्येवर झालेल्या सखोल चर्चेनुसार सदरचा पाणी प्रश्न पुढील कालावधीत लवकरात लवकर कायमस्वरूपी सोडवण्यात येणार आहे. या चर्चेमुळे शिष्टमंडळासह नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शिष्टमंडळात शिवसेना विधानसभा संघटक श्री. बंडूशेठ पाटील, ज्येष्ठ समाजसेवक व शिवसैनिक श्री. दत्ता शेठ वझे, उपतालुकाप्रमुख श्री. गणेश जेपाल, उपतालुकाप्रमुख श्री. विकास देसले, विभाग प्रमुख श्री. किसन जाधव, विभागप्रमुख श्री. अनिल म्हात्रे, श्री. हितेश गांधी आदी मान्यवरांचा समावेश होता.

आमदार श्री. राजेश गोवर्धन मोरे यांनी पाणीप्रश्न सोडवण्यासाठी घेतलेली ही तातडीची कृती नागरिकांसाठी दिलासा देणारी ठरली आहे. या प्रलंबित प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी त्यांनी केलेले प्रयत्न १४ गावं आणि २७ गावांना पुरेसा व मुबलक पाणीपुरवठा मिळवून देण्यासाठी निर्णायक ठरणार आहे.

## वीटभट्टी मालकांचा आंदोलनाचा इशारा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी**

कोकणातील शेतीला जोडधंदा म्हणून केल्या जाणाऱ्या पारंपरिक व्यवसाय माती पासून बनविल्या जाणाऱ्या वीट मालकांना येणाऱ्या समस्या दूर करा अशी मागणी करणारे निवेदन ठाणे पालघर रायगड जिल्ह्यातील आमदारांना कोकण विभागीय वीट भट्टी चालक-मालक संघटनेतर्फे देण्यात येणार आहे शासनाच्या जाती विशेष संघटनांचा दबाव मजूर कामगारांना वीट भट्टी मालकांच्या विरोधात चुकीच्या पद्धतीची माहिती देऊन काही विशिष्ट संघटना वीट भट्टी बांधताना खोट्या अॅट्रॉसिटी कायद्याखाली केसेस करणे अशा प्रकारची मालिका वीट भट्टी वीट

### हिवाळी अधिवेशनामध्ये ठाणे पालघर रायगड जिल्ह्यातील वीटभट्टी मालक घालणार आमदारांना साकडे

भट्टी मालकांना सोसावी लागत आहे याबाबत संबंधित स्थानिक आमदारांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये हा विषय चर्चेला ठेवा लक्षवेधी मांडावी अशी विनंती करणारे पत्र कोकण विभागीय वीट भट्टी मालकां तर्फे देण्यात आहे अशी माहिती कोकण विभागीय वीट भट्टी चालक-मालक संघटनेतर्फे देण्यात आली आहे

कोकणासहित भाग असलेल्या ठाणे पालघर रायगड ते तीन जिल्ह्यांमध्ये शेतीला पूरक म्हणून भरतीचा व्यवसाय केला जातो शेकडो आदिवासी मजूर कामगार यांना मोलमजुरी रोजगार मिळतो वीट भट्टी मालक त्यांना रोजगार मिळवून देतात मिळवून देतात परंतु काही वेळेला ऐकीव माहितीवरून पोलीस स्थानकामध्ये वीट भट्टी मालकांचे विरोधात विशिष्ट संघटनेचया दबावाखाली ?ट्रॉसिटी सारखे गुन्हे दाखल होतात अशा प्रकारामुळे वीट भट्टी मालक मेटाकुटीला आले आहेत तो अन्याय दूर करावा तसेच रॉयलटी किंवा अनेक प्रश्न विट व्यवसायाला लघु उद्योगाचा दर्जा असे अनेक प्रश्न मांडले जाणार आहेत

## शहापूर , मुरबाड टँकरमुक्तीसाठी ‘शिवजल सुराज्य अभियान’



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे : दि. १२, :** ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात मुरबाड व शहापूर तालुक्यातील पाणी समस्या सोडविण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत टँकरग्रस्त भागात ‘शिवजल सुराज्य अभियान’ दि. १० डिसेंबर, २०२४ पासून राबविण्यात येत आहे. ‘शिवजल सुराज्य अभियान’ यशस्वीपणे अंमलबजावणी व संनियत्रणासाठी जिल्हास्तरावर समिती निश्चित करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे समिती अध्यक्ष तथा मुख्य मार्गदर्शक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार समिती सहअध्यक्ष म्हणून कामकाज पाहणार आहेत.

कच्चे बंधारे/ वनराई बंधारे, साखळी सिमेंट बंधारे(नाला गाळ काढणे), के.टी.वेअर/ साठवण बंधारा दुरुस्ती/ नवीन कामे, पाझर तलाव/ गावतलाव दुरुस्ती/ गाळकाढणे/ नवीन कामे, खोल सलग समतळचर/ सलग समातरचर, पिण्यांच्या पाण्याची विहिर गाळ काढणे / दुरुस्ती, जलकुभ गाळ काढणे / नवीन बुडक्या, विंधण विहिरीव्दारे छतावरील पाऊसपाणी संकलन, रिचार्ज शाफ्ट

पान ४ वर ▶▶

> शहापूर तालुक्यातील ४३ गाव, १५५ पाडे असे एकूण १९८ गाव/पाड्यात जुन २०२४ अखेर ४२ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत होता, तर मुरबाड तालुक्यातील १७ गाव, १८ पाडे असे एकूण ३५ गाव/पाड्यात जुन २०२४ अखेर ६ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत होता. असे एकूण २३३ गाव/पाडे टँकरग्रस्त होते तर ८२ हजार १०३ बाधित लोकसंख्या होती. ही समस्या लक्षात घेऊन शहापूर व मुरबाड या तालुक्यात टँकर मार्फत पाणी पुरवठा करण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी व लोक सहभागातून पाणी समस्या सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे.

# अबू सालेमला २५ वर्षांची शिक्षा पूर्ण करावी लागेल

## सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुंबई(प्रतिनिधी) :**
१९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटातील त्याच्या भूमिकेसाठी अबू सालेमला पूर्ण २५ वर्षांची शिक्षा भोगावी लागेल, असा निर्णय न्यायालयाने देत त्याची लवकर सुटका करण्याची याचिका फेटाळून लावली आहे. मार्च १९९३ च्या मुंबई साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील दोषी अबू सालेम अब्दुल कय्युम अन्सारी याला दहशतवादी आणि विघटनकारी क्रियाकलाप (प्रतिबंध) कायद्यांतर्गत नियुक्त केलेल्या विशेष न्यायालयाने २५ वर्षांची शिक्षा भोगावी, असा निर्णय दिला आहे.

५५ वर्षीय सालेमला २५ वर्षांची शिक्षा पूर्ण करावी लागेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. सालेमच्या याचिकेत असा युक्तिवाद करण्यात आला की, त्याच्या शिक्षेत २ वर्षे आणि १० महिन्यांची माफी चांगली वागणूक आणि विशेष प्रसंगी मंजूर केली गेली पाहिजे. त्याने दावा केला की, त्याचा एकूण कारावास २५ वर्षांपर्यंत पोहोचला आहे. मात्र, न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळून लावला. ११ नोव्हेंबर २००५ ला पोर्तुगालमधून प्रत्यार्पण केलेल्या, सालेमला खटल्याचा सामना करावा लागला आणि १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटांसह दोन टाडा खटल्यांमध्ये त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली.

अबू सालेम हा १९९० च्या काळातला खतरनाक डॉन होता. तो सुरुवातीला दाऊद इब्राहीमच्या डी कंपनीसोबत काम करायचा. पण नंतर त्याचं डी कंपनीसोबत फार नातं राहिलं नाही. अबू सालेमवर अनेक निष्पाप जीवांची हत्या केल्याचा आरोप आहे. बॉलिवूड स्टार, चित्रपट निर्माते, मोठमोठे बिल्डर यांच्याकडून खंडणी वसूल करणं हे त्याच्यासाठी खूप सर्वसामान्य होतं. तो विविध प्रकरणांमध्ये सध्या जेलमध्ये शिक्षा भोगत आहे. विशेष टाडा कोर्टाने मुंबईतील साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी अबू सालेम याच्याविरोधात २००६ मध्ये आठ आरोप केले होते. त्याममध्ये साखली बॉम्बस्फोटावेळी शस्त्रांचं वाटप करण्याचादेखील आरोप होता.

# केडीएमसीच्या 'क' प्रभागात थकबाकी रक्कमेपोटी मालमत्ता सील करण्याची कारवाई

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**
कल्याण पश्चिमेतील ' क' प्रभाग क्षेत्रातील मालमत्ता कराची रक्कम थकीत असलेल्या मालमत्तांना वारंवार नोटीस देवूनसुध्दा मालमत्ता कराचा भरणा करीत नसल्यामुळे महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार आणि कर निर्धारण व संकलन विभागाच्या उपआयुक्त स्वाती देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली 'क' प्रभागाचे सहा.आयुक्त धनंजय थोरात व अधिक्षक उमेश यमगर यांच्या पथकाने रक्कम रु. ३६ लाख ४४ हजार ८३५ इतक्या रकमे पोटी मालमत्ता सिल करण्याची धडक कारवाई नुकतीच केली.यामध्ये कल्याण (पश्चिम) गोविंदवाडी



येथील मुसा बिल्डींग मधील शेख मुसा शेख नासीर यांच्या मालमत्ता क्र.C03016911700रक्कम रु. १० लाख ६६ हजार ३७५ थकबाकीपोटी दुकान क्र. १,२,३ व ५ सील करण्यात आले.

कल्याण (पश्चिम) आग्रा रोड येथील बोरगांवकर टॉवर मधील धुरापतारी बी.गुप्ता यांच्या मालमत्ता क्र. C01012856400/004 रक्कम र ९१ हजार ५३२ रुपये थकबाकीपोटी सील करण्यात आले. कल्याण (पश्चिम) आग्रारोड येथील ममता टॉवर मधील.

ईश्वरलाल एल.वेलाणी, एम. आर.पटेल, एस.आय.वेलाणी आणि एन.आर.रंगाणी यांच्या मालमत्ता क्र. C01014226100/ऑफीस-१ रक्कम रु. ३ लाख १६ हजार ७८० थकबाकीपोटी सील करण्यात आले.

कल्याण (पश्चिम) टिळक चौक येथील लेले आळी येथील स्वप्निल भाऊराव ईरांडे यांच्या मालमत्ता क्र. C01012073100/101-A रक्कम रु. १७ लाख ८९ हजार ४९९ थकबाकीपोटी सील करण्यात आले.कल्याण (पश्चिम) टिळक चौक येथील लेले आळी येथील केतन मनोहर मांडे यांच्या मालमत्ता क्र. C01012073100/SHOP-४ रक्कम रु.१७ लाख ८९ हजार ४९९ थकबाकीपोटी सील करण्यात आले.

तसेच कल्याण (पश्चिम) लाल चौकी परिसरातील बारकु धोंडू ठाकरे यांचे मालमत्ता क्र. C02000626500 रक्कम रु. ३ लाख ७ हजार ७३६ इतक्या थकबाकीपोटी सील करण्यात आले.

# महिला बुकिंग लिपिकला दक्षता विभागाच्या कारवाईत पकडले

## अतिरिक्त ९०० रुपये वसूल

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :**
कल्याण बुकिंग कार्यालयात दक्षता विभागाच्या कारवाईत एका महिला बुकिंग क्लार्कला पकडण्यात आले असून, तिच्याकडून ९०० रुपयांची वाढीव रक्कम जप्त करण्यात आली आहे. महिला बुकिंग क्लार्क मंजुषा मते या बुधवारी दुपारी खिडकी क्रमांक-२ येथे ड्युटी करत होत्या. दरम्यान, मध्य रेल्वेच्या दक्षता पथकाने तेथे पोहोचून खिडकी क्रमांक-२ चा शोध घेतला. झडती दरम्यान महिला बुकिंग क्लार्क मंजुषा मते यांच्या काउंटरमधून अतिरिक्त ९०० रुपये जप्त करण्यात आले. अशी माहिती रेल्वेच्या एका अधिकाऱ्या कडून मिळाली आहे.

# किल्ले दुर्गाडी खटल्यातील वकिलांचा सत्कार



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी) :**
कल्याणच्या ऐतिहासिक दुर्गाडी किल्ल्यासंदर्भातील दाव्याचा निकाल तब्बल ४८ वर्षांच्या प्रतिक्षेनंतर लागला. दुर्गाडी किल्ला ही वक्फ बोर्डाची जागा असल्याचा मजलीस संघटनेचा दावा न्यायालयाने फेटाळला. न्यायालयात हिंदुच्या बाजूने मांडणाऱ्या वकिलांचा ऋणनिर्देश करण्यासाठीच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते विजय साळवी यांच्यावतीने जाहीर सत्कार करण्यात आला.

कल्याण पश्चिमेतील रामबागेतील श्री दत्तमंदिर येथील श्री दत्तजन्मोत्सवात ॲड सुरेश पटवर्धन यांचा सत्कार शिवसेना उपनेते विजय साळवी यांनी केला. ॲड. भिकाजी साळवी यांचा सत्कार जेष्ठ पत्रकार तुषार राजे यांनी केला. तर ॲड जयेश साळवी यांचा सत्कार रवि कपोते यांनी केला.

# हिंदी व गणित विषयांकरिता मासिक तत्वावर सहाय्यक शिक्षक पदासाठी पात्र व इच्छूक उमेदवारांनी अर्ज सादर करावेत

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता रायगड(प्रतिनिधी)**
सामाजिक न्याय विभागांतर्गत रायगड जिल्ह्यात सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाच्या अधिनस्त अनुसूचित जाती/नवबौध्द मुलांकरिता शासकीय निवासीशाळा, जावळी, ता.माणगांव येथे शासकीय निवासी शाळा कार्यान्वीत आहे. येथे इयत्ता ६ वी ते १० वी साठी तात्पुरत्या स्वरुपात मासिका तत्वावर ६ महिने किंवा नियमित शिक्षक हजर होईपर्यंत हिंदी व गणित विषयांकरिता मासिक तत्वावर सहाय्यक शिक्षक पदासाठी पात्र व इच्छूक उमेदवारांनी (बायोडाटा, रिज़्यूम) आवश्यक शैक्षणिक अर्हताचे कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त, समाज कल्याण समाधान इंगळे यांनी केले आहे.
याकरिता सहाय्यक शिक्षक (मासिक तत्वावर) शैक्षणिक पात्रता-BA.B.Ed, विषय-हिंदी, आवश्यक पद संख्या ०१. सहाय्यक शिक्षक (मासिका तत्वावर), शैक्षणिक पात्रता-B.Sc. B.Ed, विषय-गणित, आवश्यक पद संख्या ०१.
यासाठी अटी व शर्ती पुढीलप्रमाणे : सदर पदावर घडयाळी तासाप्रमाणे शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या मंजूर दरानुसार मानधन देय राहील. एकत्रित मानधना व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही. उमेदवारांची निवड करताना अनुभव तसेच TET परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांना प्रधान्य देण्यात येईल. शैक्षणिक पात्रता,अनुभव इ.अहर्ता किमान असून,किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलविण्याकरिता पात्र असणार नाही. सेवा प्रवेश नियम आणि शासनाकडून तदनंतर वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा तसेच कार्यनियमावलीतील तरतुदींनुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येईल. सदर पदे मानधन/तासिका तत्वावर असून,भरती प्रक्रियेचे संपूर्ण अधिकार,पदे कमी जास्ती करणे,भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करणे अटी व शर्तीमध्ये बदल करणे ,सदरील पदे कधीही कोणताही कारण न देता समाप्त करण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त समाज कल्याण रायगड, अलिबागयांनी राखून ठेवलेले आहेत.
पात्र व इछुक उमेदवारांनी आपला अर्ज जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे अनुसूचित जाती/नवबौध्द मुलांकरिता शासकीय निवासी शाळा, जावळी, ता.माणगांव येथे लवकरात लवकर सादर करावेत.

# कान्होळ ग्रामपंचायत मधील बोरिवली येथे विविध विकासकामांचे आमदार कथोरेंच्या हस्ते भूमिपूजन




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ मुरबाड(दिलीप पवार) :**
मुरबाड तालुक्यातील कान्होळ ग्रामपंचायत मधील बोरिवली येथिल विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा आज मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरेंच्या हस्ते करण्यात आले. कान्होळ ग्रामपंचायतच्या सरपंच रेश्मा जयवंत घरत यांच्या प्रयत्नाने आमदार कथोरेंच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्याने विविध विकासकामे होत आहेत. यामध्ये जलजिवन मिशन योजना, बोरिवली स्मशानभूमी, बोरिवली -न्हावे रस्ता, जनसुविधेतून अंतर्गत रस्ता, सभामंडप, स्मशानभूमी सुशोभीकरण,व्यायाम शाळा साहित्य व केटी बंधारा अशा विविध कामांचे भूमिपूजन व लोकार्पण आज करण्यात आले. तसेच शेतकर्यांसाठी कडधान्य बियाणे, नागरिकांसाठी आयुष्य मान भारत कार्ड याजबरोबर महिलांना उज्वला योजनेतून मोफत गॅस सिलेंडरचे वाटपही यावेळी करण्यात आले.यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार कथोरे यांनी सरपंच सौ.रेश्मा घरत व समाजसेवक बाळा घरत यांचे कौतुक करत पाचव्यांदा आमदार म्हणून निवडून देऊन जनतेची सेवा करण्याची संधी दिल्या बद्दल मतदारांचे आभार मानले.

तर मुरबाड तालुका तुम्ही हुकूमशाही पासून वाचवला असा टोळा विरोधकांना लगावला.यावेळी व्यासपीठावर उल्हास बांगर, दिपक पवार,नितीन मोहपे, सुरेश बांगर, छायाताई चौधरी, दिनेश उघडे, तालुका कृषी अधिकारी नामदेव धांडे, नरेश मोरे,रेश्मा खरे,सुवर्णा गायकर,लता भोईर यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ , महिला भगिनी उपस्थित होते तर या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सूभाष देसले यांनी केले.

# केडीएमटी आणि घनकचरा विभागाच्या वाहनांची फिटनेस तपासणी करण्याची रूपेश भोईर यांची मागणी

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :**
मुंबई च्या कुर्ला येथे झालेल्या बेस्ट बस च्या अपघाता नंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधानसभा सह संघटक रूपेश भोईर यांनी केटीएमटी आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाला पत्र लिहून दोन्ही विभागाच्या वाहनांची फिटनेस तपासणी करण्याची मागणी केली आहे.
रूपेश भोईर यांनी पत्रकारांना सांगितले की, कुर्ला येथील बेस्ट बसच्या दुर्घटना झाल्यानंतर केडीएमटीच्या बसेस व घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वाहनांची फिटनेस बद्दल शंका निर्माण झाली आहे. काही महिन्या पूर्वी भोईर यांनी केडीएमटीच्या बसेसच्या फिटनेस बद्दल प्रश्न उपस्थित केला होता. हा मुद्दा खरा असल्यामुळे कल्याणच्या उप प्रादेशिक परिवहन विभागाने केडीएमटीच्या बसेसवर फिटनेस नसल्यामुळे हजारों रूपयांचे दंड आकारले होते. त्यानंतर ही केडीएमटीला जाग आली नाही. आज ही केडीएमटीच्या नादुरुस्त बसेस रस्त्यावर धावत आहेत. ठरलेल्या पेक्षा जास्त प्रवाशी बसेस मध्ये भरले जात आहेत. त्यामुळे संभावित दुर्घटने कडे दुर्लक्ष करता येणार नाही. कल्याणचे रस्ते अरूंद असल्यामुळे अश्या बसेस रस्त्यावर धावल्या नंतर कुर्ला सारखी घटनेची पुनरावृत्ती कल्याणला होणार नाही अशी हमी कुणी देऊ शकत नाही. याच बरोबर घनकचरा विभागाच्या कचरा उचलणा-या गाडया सुद्धा पूर्ण पणे फिट नाही. त्यामुळे त्या गाडया सुद्धा फिटनेसच्या चाचणी शिवाय रस्त्यावर येऊ देऊ नका. अशी मागणी रूपेश भोईर यांनी केली आहे.

# आफ्रिका खंडाचे दोन तुकडे होणार ?



पृथ्वीचा ७१ टक्के भाग हा पाण्याने व्यापला आहे हे आपल्याला सगळयांनाच माहित आहे. त्यातील बहुतेक पाणी हे पृथ्वीवरील पाच महासागरांमध्ये विभागलेले आहे. ज्यामध्ये पॅसिफिक, अटलांटिक, भारतीय, दक्षिण आणि आर्क्टिक महासागर यांचा समावेश आहे. पण आता शास्त्रज्ञांचा असा दावा आहे की, लवकरच जगात सहावा महासागर निर्माण होऊ शकतो. शास्त्रज्ञांना पूर्व आफ्रिकेत एक मोठी दरड सापडली आहे. शास्त्रज्ञांना दावा आहे की, येथे हळूहळू महासागर निर्माण होऊ शकतो. ज्यामुळे आफ्रिका खंडाचे दोन भाग होऊ शकतात.

पूर्वेला सोमाली प्लेट आहे आणि पश्चिमेला न्युबियन प्लेट आहे. जिथे या प्लेट्स जटिल टेक्टोनिक पद्धतीने एकत्र येतात. या प्लेट्सचे विभाजन होऊन आफ्रिकन खंडाचे दोन स्वतंत्र भाग होऊ शकतात. पूर्वेकडील भाग भविष्यात एक लघु-खंड बनण्याची शक्यता आहे. जसजसे प्लेट्स हळूहळू वेगळे होत जातील तसे तेथे पृथ्वीच्या आवरणातून मॅग्मा रिकाम्या जागा भरण्यासाठी उगवतो आणि नवीन महासागराचा कवच तयार करतो. ही एक चालणारी प्रक्रिया आहे. लाखो वर्षांपूर्वी दक्षिण अमेरिका आणि आफ्रिका अशाच प्रकारे विभक्त झाल्याचा दावा शास्त्रज्ञांनी केला आहे. जर असे झाले तर पृथ्वीवर मोठा भौगोलिक बदल दिसू शकतो. आफ्रिका खंडाचे विभाजन होत राहिल्याने, पूर्वेकडील भाग काही काळाने वेगळा होऊन एक छोटा खंड बनू शकतो. या प्रक्रियेमुळे एक नवीन किनारपट्टी तयार होऊ शकते. जसजसे ही फट रुंद होत जाईल तसतसे त्या लाल समुद्र आणि एडनच्या आखातातून पाणी भरायला सुरुवात होईल. ज्यामुळे एक नवीन सागरी मार्ग ही तयार होऊ शकतो. तसेच जैवविविधतेचा उदय होऊ शकतो. पण यामुळे प्रभावित देशांसाठी आर्थिक संधी, जसे की मासेमारीसाठी मैदान आणि सागरी व्यापार मार्ग देखील मिळू शकतो. पण यामुळे काही आव्हानं देखील येऊ शकतात. जशी की, शेती, पायाभूत सुविधा आणि मानवी वसाहती यांच्यावर परिणाम होऊ शकतो.
पण ही लाखो वर्षांपासून सुरू असलेली संथ प्रक्रिया आहे. पण अलीकडच्या काळात त्याला वेग आल्याचं दिसतंय. २०२० मध्ये, शास्त्रज्ञांनी असे भाकीत केले होते. पण २०२४ मध्ये आग्नेय आफ्रिकेत एक महाकाय असी फट सापडल्याने त्याला आणखी गती मिळाल्याचं शास्त्रज्ञांचं लक्षात आलंय.

# ३१ मार्चपर्यंत सर्व वाहनांवर HSRP नंबरप्लेट बसवणे बंधनकारक

## कल्याण आरटीओ कार्यक्षेत्रासाठी नेमण्यात आली एजन्सी

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी) :**
महाराष्ट्रातील १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या नोंदणीकृत मोटार वाहनांवर उच्च सुरक्षा वाहन क्रमांक प्लेट (हाय सिक्युरिटी नंबरप्लेट - HSRP) बसविणे बंधनकारक करण्यासंबंधीचे निर्देश राज्याच्या परिवहन आयुक्तांनी दिले आहेत. त्यानुसार कल्याण उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या नोंदणीकृत वाहनांवर ही HSRP हाय सिक्युरिटी नंबरप्लेट बसविणे बंधनकारक असून ३१ मार्च २०२५ पूर्वी ही नंबरप्लेट बसवण्याचे आवाहन कल्याण आरटीओचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी केले आहे. ही HSRP हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्यासाठी परिवहन विभागाकडून कल्याण उप प्रादेशिक कार्यालयाकरता मे. रियल माझोन इंडिया एजन्सीची नियुक्ती करत त्यासाठी लागणारे शुल्कही निर्धारित करण्यात आले आहे.
राष्ट्रीय सुरक्षा, वाहनांमुळे होणारे गुन्हे कमी व्हावेत, छेडछाड आणि बनावटगिरी रोखण्यासाठी तसेच रस्त्यांवर चालणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांची ओळख पटविण्यासाठी या व अशा अनेक प्रकारच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी मोटार वाहनांवरील हाय सिक्यूरिटी नंबरप्लेट बसविणे अत्यावश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने देखील सर्व मोटार वाहनांवर अशा नंबरप्लेट बसविण्याबाबत निर्देश जारी केले आहेत.

राज्यात सन २०१९ पासून नव्या उत्पादित वाहनांना HSRP नंबर प्लेट सक्तीची केली असून वाहनाला ही नंबरप्लेट एकदा लावल्यानंतर ती पुन्हा काढता येत नाही. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने बनविण्यात आलेली नंबरप्लेट टॅम्परप्रुफ असते. ही नंबरप्लेट अल्युमिनिअम मिश्र धातूपासून बनविलेली असते. या नंबरप्लेटवर निळया रंगाच्या चक्राचे होलोग्राम आणि वाहन क्रमांकाच्या काळया तिरप्या ओळीत IND अशी अक्षरे लिहिलेली असतात.HSRP हाय सिक्यूरिटी नंबरप्लेटचे महत्व लक्षात घेता उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील दि.०१ एप्रिल २०१९ पूर्वीच्या नोंदणीकृत वाहनांवर हाय सिक्यूरिटी नंबरप्लेट (HSRP) नंबरप्लेट बसविणे बंधनकारक असून त्याकरीता परिवहन विभागाने या कार्यालयासाठी नियुक्त केलेल्या मे. रियल माझोन इंडिया एजन्सीकडून ही नंबरप्लेट बसवून घेता येईल.

दैनिक जीवनदीप वार्ता
मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातींना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.
:: कार्यालय ::
९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१
- E Mail -
jeevandeepvartanews2020@gmail.com news.thanejeevandeep@gmail.com




१३ डिसेंबर २०२४
शुक्रवार

**मेष**
भावा - बहिणीं सोबत कोणत्याही मुद्द्यावरून वाद झाला असेल तर तोही सोडवला जाईल. कुटुंबाला वेळ दिल्याने घरातील वातावरण प्रसन्न राहील.

**वृषभ**
तुम्ही काही विशेष कामासाठी प्रयत्न करत असाल तर तुम्हाला यश मिळू शकते. कोणतेही प्रकरण शांततेने सोडवण्याचा प्रयत्न करा.

**मिथुन**
विरोधी पक्ष तुमच्यापुढे झुकेल आणि तुमचे सोशल नेटवर्क मजबूत होईल. तुमच्या दिनचर्येत काही बदल होईल. जोखीम घेण्यापासून मागे हटू नका.

**कर्क**
तुम्हाला तुमच्या संपर्कांद्वारे व्यवसायाशी संबंधित चांगली माहिती मिळेल. दिवस आत्मविश्वासाने भरलेला असेल. कुटुंबातली भांडणे बाहेर येऊ देऊ नका.

**सिंह**
तुम्ही संध्याकाळी मित्रांसोबत जास्त वेळ घालवाल. दिवस तुमच्यासाठी चांगला जाईल. काही मोठे आणि वेगळे काम करण्याचा विचार करू शकता.

**कन्या**
सुज्ञ व्यक्तीकडून तुम्हाला महत्त्वाचा सल्ला मिळेल. तुमचे मत कुटुंबासमोर मांडण्याची संधी मिळेल, लोक तुमच्या योजनेने खूप प्रभावित होतील.

**तूळ**
वडिलांचे आशीर्वाद तुमच्या पाठीशी राहतील. आज तुमच्या कामाच्या क्षमतेत मोठा बदल होईल. तुमच्या वागण्यातून लोकांमध्ये समन्वय राखाल.

**वृश्चिक**
मुलांशी काही वाद होण्याची शक्यता आहे, तुम्ही त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करा. आज तुम्ही केवळ कौटुंबिक कार्यात व्यस्त असाल.

**धनु**
आज अनुकूल काळ आहे, परंतु आपल्या मेहनतीचे चांगले परिणाम प्राप्त करण्यासाठी, आपल्याला कार्याभिमुख रहावे लागेल.

**मकर**
मित्राचा सल्ला तुमच्यासाठी खूप उपयुक्त ठरेल.आपण कुटुंबासोबत घरी चित्रपट पाहण्याचा बेत करू. आरोग्याच्या दृष्टीने तुम्हाला निरोगी वाटेल.

**कुंभ**
आर्थिक स्थिती सुधारण्याचे प्रयत्न यशस्वी होतील.मुलांकडून काही विशेष आनंदाची बातमी मिळेल, घरातील सर्वजण आनंदी होतील.

**मीन**
खरेदी-विक्रीचे नियोजन केले असेल तर ते पूर्ण होऊ शकते. तुम्ही जुन्या गोष्टींच्या त्रासात पडणे टाळावे. लव्हमेट्स भावना समजून घेतील.

# दुबईला जाणाऱ्या भारतीयांचा व्हिसा का होतोय कॅन्सल?




दुबईला जाण्याचा विचार करत असाल तर तुमच्यासाठी एक चिंता वाढवणारी बातमी आहे. कारण दुबईला जाणाऱ्या लोकांचा व्हिसा नाकारण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे ज्या भारतीयांना दुबईला जायचे आहे त्यांनी आधी व्हिसा कन्फर्म झाल्यानंतरच पुढचं नियोजन करणं चांगलं ठरेल. अन्यथा तुम्हामा मोठा आर्थिक फटका बसू शकतो. दुबईसाठी भारतीयांचा व्हिसा नाकारण्याचे प्रमाण वाढले आहे. याचे कारण दुबईने नवीन व्हिसा नियम जारी केले आहे.

दुबईला जाण्यासाठी आता या कडक नियमांचं पालन करावे लागणार आहे. कागदपत्रे आणि आर्थिक आवश्यकतांमुळे छाननी वाढली आहे. त्यामुळे व्हिसा नाकारण्याचे प्रमाणही वाढलंय. दुबईसाठी प्रत्येक १०० व्हिसा अर्जांमागे पाच ते सहा अर्ज नाकारले जात आहेत.

**दुबईकडून नवीन नियम लागू**

UAE ने व्हिसाचा गैरवापर टाळण्यासाठी नियमात बदल केले आहेत. इमिग्रेशन कायद्यांचे पालन करावा म्हणून हे बदल करण्यात आले आहेत. या नियमांनुसार, अर्जदाराना आता ते जेथे थांबणार आहेत त्याचा पत्ता, रिटर्न तिकीट आणि बँक बॅलन्स यांची संपूर्ण माहिती कागदपत्रांसह सादर करावी लागणार आहेत. जे मित्र किंवा नातेवाईकांकडे जाणार आहेत त्यांना त्यांच्या होस्टकडून अतिरिक्त कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. जसे की भाडे करार, UAE ID आणि निवास व्हिसा. त्यामुळे भारतीय प्रवाशांना आता दुबईला जाताना काही अडचणींचा सामना करावा लागत आहे.

**बँक खात्यात किती रक्कम असावी**

दुबईसाठी जर तुम्हाला व्हिसा हवा असेल तर तुम्हाला तुमच्या बँक खात्यात किती पैसे आहेत याची देखील माहिती द्यावी लागणार आहे. नव्या नियमानुसार किमान रक्कम किती असावी याबाबत देखील मर्यादा ठेवण्यात आली आहे. तुम्ही दुबईला किती दिवस राहणार आहेत यावरुन ती रक्कम ठरवली जाणार आहे. जर तुम्ही दोन महिन्यांसाठी दुबईला जाणार आहात तर तुमच्या खात्यात ५,००० दिरहम आणि तीन महिन्यांसाठी जाणार आहात तर तुमच्या खात्यात ३,००० दिरहम आवश्यक आहेत.

**प्रवाशांचे आर्थिक नुकसान**

अनेक प्रकरणात सर्व कागदपत्र असताना देखील व्हिसा नाकारला गेल्याची तक्रारी आल्या आहेत. त्यामुळे भारतीय प्रवाशांचे आणि ट्रॅव्हल एजंटचेही नुकसान होत आहे. ट्रॅव्हल एजंट्सने माहिती दिली आहे की, व्हिसा नाकारण्याचं प्रमाण अचानक वाढल आहे. त्यामुळे केवळ व्हिसा शुल्कच नाही तर आधीच बुक केलेली विमान तिकिटे आणि हॉटेल बुकिंगचे पैसेही बुडत आहेत. नवीन नियमांच्या आधी दुबई व्हिसा नाकारण्याचे प्रमाण केवळ एक ते दोन टक्के होते. पण नवीन नियम लागू झाल्यापासून दररोज १०० अर्जांपैकी किमान ५-६ व्हिसा नाकारले जात आहेत.

# सफाळे रेल्वे क्रॉसिंग फाटकात अपघाताचे प्रमाण वाढले

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता पालघर(हृषीकेश जाधव) :**

सफाळे रेल्वे पोलीस यांचे जनतेला जाहीर आवाहन आहे की, अतिघाई संकटात नेई या म्हणीचा अर्थ अजूनही सफाळे रेल्वे प्रवासी आणि रेल्वे फाटकात, फाटकातून सफाळे पुर्वी व पश्चिमेस जाणारी जनता यांना ज्ञात झालेला नाही.






सफाळे स्थानकातून रेल्वे गाडीचे आगमन आणि निर्गमन होत असताना, रहदारी साठी व जनतेच्या सुरक्षिते साठी रेल्वे फाटक बंद करण्यात येते. व रेल्वेगाडी गेल्यावर रहदारी साठी फाटक सुरू पुन्हा करण्यात येते.

परंतु रेल्वे फाटक बंद असताना सुध्दा अनेक रथी महारथी हे रेल्वे स्टेशन वरील उद्घघोषक व्दारे, रेल्वे गाडी / फास्ट रेल्वे, मालगाडी जात असल्याची सुचना वारंवार देण्यात येत असल्या तरी रेल्वे गाडी दिसत असताना सुध्दा, रेल्वे रूळ ओलांडून पूर्वेकडून पश्चिमकडे किंवा पश्चिमे कडून पुर्वेला जाण्या येण्याची घाई करित असतानांचे दिसून येत आहे.वरील अनुशंगाने सफाळे रेल्वे पोलीस GRP प्रभारी अधिकारी, रेल्वे सुरक्षा दल RPF प्रभारी अधिकारी, कर्मचारी तसेच सफाळे रेल्वे स्टेशन अधिकारी, यांची प्रवासी यात्रेकरू, रेल्वे फाटकातून रहदारी करणारे सुजाण नागरिक यांनी आपल्या कुटुंबासाठी आपण महत्त्वाचे घटक, कर्ता पुरुष / महिला आहेत. यांचे कळत नकळतपणे लक्षात (भान) ठेऊन रेल्वे फाटकातून जात येत असतांना रेल्वे फाटक बंद असतानां घाई करू नये. असे सर्व नागरिक यांना रेल्वे पोलीस, रेल्वे सुरक्षा बल, सफाळे - पालघर यांच्या वतीने आव्हान करण्यात येत आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट

## छत्रपती शिवाजी महाराजांची अश्वारूढ मूर्ती भेट

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता./ नवी दिल्ली :**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ७ लोक कल्याण मार्ग येथील पंतप्रधानांच्या शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली.

**छत्रपती शिवाजी महाराजांची अश्वारूढ मूर्ती पंतप्रधान मोदी यांना भेट**

पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतल्यानंतर, श्री. फडणवीस यांनी महाराष्ट्र सदन येथे प्रसार माध्यमांशी संवाद साधला. छत्रपती शिवाजी महाराजांची अश्वारूढ मूर्ती पंतप्रधान मोदी यांना भेट दिल्याबाबतच्या भावना व्यक्त करत, मुख्यमंत्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नेतृत्वावर प्रकाश टाकत, पंतप्रधान श्री. मोदी यांची शिवाजी महाराजांवर अपार श्रद्धा असल्याचे सांगितले.

पंतप्रधान श्री.मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आपली निष्ठा आणि आदरभाव व्यक्त केल्याचीही माहिती त्यांनी यावेळी माध्यम प्रतिनिधींना दिली.या भेटी दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या विकास योजनांबाबत पंतप्रधानांशी सविस्तर चर्चा केल्याबाबत सांगितले. या चर्चेदरम्यान पंतप्रधान श्री. मोदी यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी महाराष्ट्र महत्त्वाचे राज्य असल्याचे सांगत, राज्याच्या प्रगतीसाठी केंद्र सरकारकडून सर्वत्तोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासन दिले असल्याचे श्री. फडणवीस यावेळी म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील मूल्ये आणि त्यांचे प्रेरणादायी नेतृत्वाबद्दल माध्यमांशी संवाद साधताना, पंतप्रधान मोदींनी वर्ष २०१४ मध्ये रायगडावरून निवडणूकीच्या प्रचाराला सुरुवात केल्याच्या आठवणींना उजाळा दिला. पंतप्रधान श्री.मोदी यांचे मार्गदर्शन आणि प्रेम हे महाराष्ट्राला सतत प्रेरणा देत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

या दोन दिवसीय दौऱ्या दरम्यान मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, तसेच आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे. पी. नड्डा यांच्याही सदिच्छा भेटी घेतल्या. या भेटी मध्ये राज्याच्या विकासासाठी विविध योजनांवर चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले.

# १४१ उल्हासनगर मतदार संघातील निवडणूक अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :**

दिनांक ११/१२/२०२४ रोजी लोकसभा व विधानसभा निवडणूका २०२४ अंतर्गत मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी ज्या नियुक्त अधिकारी व कर्मचा-यांनी निवडणूकीचे काम यशस्वीरित्या पार पाडले त्यांचेसाठी सिंधू भवन, सपना गार्डन, उल्हासनगर येथे सांगता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास सर्व अधिकारी व कर्मचारी यांना प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले. तद्नंतर स्नेहभोजनाची सोय करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्रीम. कल्याणी कदम, तहसिलदार तथा सहा. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मांडली व कार्यक्रमाच्या शेवटी मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्री. विजयानंद शर्मा यांनी निवडणूक प्रक्रियेत कोणताही अडथळा आला नाही व निवडणूकीचे काम योग्यरित्या पार पाडल्याबाबत सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानले.

या कार्यक्रमाचे सुत्र संचालन श्री. राजेश घनघाव, दिव्यांग कल्याणकारी विभाग प्रमुख उ.म.पा., यांनी केले. तसेच श्री. रमेश अव्हाड, लिपीक, उमपा यांनी आलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना आपल्या गायनाने मंत्रमुग्ध केले. सदर कार्यक्रमास श्री. विजयानंद शर्मा, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी तसेच श्रीम. कल्याणी कदम, तहसिलदार तथा सहा. निवडणूक निर्णय अधिकारी, श्री. किरण घुगे, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तसेच १४१ उल्हासनगर लोकसभा/ विधानसभा मतदारसंघातील नियुक्त अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# बांधकाम परवानगी बाबतची माहिती केडीएमसीच्या संकेतस्थळावर उपलब्ध

## विनापरवाना बांधकाम नियमानुकूल करण्याबाबत महापालिकेकडे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

कल्याण डोंबिवलीमहानगर पालिकेमार्फत देण्यात येणा-या बांधकाम परवानगी, सुधारीत बांधकाम परवानगी, बांधकाम पूर्णत्वाचे दाखले याबाबतची माहिती महापालिकेच्या www.kdmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असुन सदरची माहिती महारेराच्या www.maharera.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.कल्याण डोंबिवली महानगरपालिके मार्फत देण्यात येणा-या बांधकाम परवानगी व बांधकाम पूर्णत्वाचे दाखले यांची पडताळणी, सदरहू बांधकाम परवानगी प्रमाणपत्र व बांधकाम पूर्णत्वाचे दाखले यांवर उपलब्ध असलेल्या QR Code व्दारे करुन बांधकाम परवानगी, बांधकाम पूर्णत्वाचे दाखले याबाबतची सत्यता तपासू शकता व त्यामुळे आपली होणारी फसवणूक टाळू शकता असे आवाहन महापालिकेने केले आहे.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ च्या तरतूदी अन्वये शासनाने दि. १५/०३/२०२४ रोजी विनापरवाना बांधकामांना उक्त अधिनियमाच्या कलम १४३ अन्वये गुन्हा क्षमापन शुल्क (तडजोड शुल्क) निश्चित केले आहेत. तरी नागरिकांनी उक्त शासन निर्देशानुसार आपण आपले विनापरवाना केलेले बांधकाम हे एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली नुसार असल्यास नियमानुकूल करण्याबाबत महापालिकेकडे प्रस्ताव सादर करुन सदर योजनेचा लाभ घेवू शकता असे आवाहन कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्र.सहाय्यक संचालक नगररचना सुरेंद्र टेंगळे यांनी केले आहे.

# निघोजला उपसरपंच चषक भव्य क्रिकेट स्पर्धा

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता निघोज(प्रतिनिधी) :**

निघोज ग्रामपंचायती चे उपसरपंच ज्ञानेश्वर ऊर्फ माऊलीशेठ वरखडे मित्र परिवार आयोजीत भव्य अंडर आर्म नाईट प्रिमिअर लिग ' उपसरपंच चषक ' क्रिकेट स्पर्धा शुक्रवार दि . १३ ते रविवार दि . १५ या ३ दिवस संपन्न होणार असल्याची माहिती उपसरपंच ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली शेठ वरखडे मित्र परिवारा ने दिली आहे .

उपसरपंच चषक क्रिकेट स्पर्धेचे ५ वे वर्षे असून निघोज येथील वडनेर रोड वरील, वरखडे वस्ती मैदानावर या क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत . प्रथम क्रमांक १५ , ५५५ रुपये , व्दितीय क्रमांक १३ , ३३३ रुपये , तृतीय क्रमांक ११ ,१११ रुपयांची बक्षीसे ठेवण्यात आली आहेत , तर मैदान , सन्मान चिन्ह , दादा फायटर्स , बॉल / स्टम्प , बॅट ,



सरपंच इलेव्हन अळकुटी , शिवबा फायटर्स , सरपंच सचिन वराळ , शिव शंभो वॉरिअर्स , जाहिरात यासाठी विविध दानशूर व्यक्तींनी सौजन्य दिले आहे .

तर शनिवार दि . १५ रोजी ८ वाजता या स्पर्धेचे खास आकर्षण असलेल्या सायली पाटील यांचा जल्लोष म्युझिकल ऑकेस्ट्रा हा मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे .

# स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :**

स्वर्गीय लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या ७५ व्या जयंती उत्सवानिमित्त दि.१२ डिसेंबर २०२४ रोजी ठाणे जिल्हयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

त्यामध्ये संत वामन भाऊ व संत भगवानबाबा सेवा प्रतिष्ठान बदलापूर यांच्यावतीने दि.११ डिसेंबर २०२४ रोजी एक दिवसीय क्रिकेट सामण्याचे पोलीस अधिकारी राम बडे यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले. दि.१२ डिसेंबर २०२४ रोजी अखिल महाराष्ट्र वंजारी सेवा समितीचे वतीने साई चौक, खडकपाडा, कल्याण, ठाणे येथे समाजातील ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच जय भगवान मित्र मंडळ ओमकार नगर, विठ्ठल मंदिर, वरपगाव येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन अखिल भारतीय वंजारी युवा संघटनाचे अध्यक्ष व भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष धनराज गुट्टे यांनी केले आहे.

# ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाचे ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :**

ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाचे वतीने ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन दिनांक ११ व १२ डिसेंबर २०२४ रोजी महानगरपालिका शाळा क्रमांक ४४, वर्तक नगर, ठाणे येथे आयोजित करण्यात आले आहे.बुधवार दिनांक ११ डिसेंबर २०२४ रोजी सदरचे विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन उपायुक्त (शिक्षण) सचिन सांगळे यांचे शुभहस्ते व शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे, ठाणे मनपा शिक्षण विभाग आणि कार्यक्रमाचे प्रमुख वक्ता प्रा. सलील सावरकर तसेच गटाधिकारी संगीता बामणे आणि सर्व गटप्रमुख, सर्व सी आर सी प्रमुख यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.




या प्रशिक्षणामध्ये ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाच्या एकूण ९३ प्राथमिक शाळा, २१ माध्यमिक शाळा, ८ खाजगी प्राथमिक व ८ खाजगी माध्यमिक अशा एकूण १३० शाळांचा सहभाग असलेल्या या विज्ञान प्रदर्शनात मान्यवरांनी प्रथमतः विद्यार्थ्यांच्या प्रयोगांचे व प्रकल्पांचे अवलोकन करून विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. ठाणे मनपा शाळा क्रमांक ४४ च्या विद्यार्थिनींनी ईशस्तवन व स्वागत गीत सादर करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांनी आपल्या प्रास्ताविकातून, 'आपण विज्ञानाची सृष्टी घेतली पण विज्ञानाची दृष्टी कधी घेणार? असा सवाल करत अत्यंत सोप्या भाषेत विज्ञानाचे आपल्या जीवनातील महत्त्व अधोरेखित केले.उपायुक्त (शिक्षण) सचिन सांगळे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून, 'विज्ञानावर अवलंबून असलेले जीवन कसे उच्च कोटीला गेले आहे व आपल्या जीवनात विज्ञानाची भूमिका किती मोलाची आहे हे विषद केले. कार्यक्रमास प्रमुख वक्ता म्हणून लाभलेले चांदीबाई कॉलेज उल्हासनगर येथील प्राध्यापक सलील सावरकर यांनी आपल्या वक्तृत्वातून श्रद्धा आणि विज्ञान यांची सांगड घालणारा प्रसंग कथन करीत, सर्व श्रोत्यांच्या अंगावर शहारे आणले. विज्ञानाशिवाय श्रद्धा ही अंधच असते असे सांगितले.

मागील वर्षी विज्ञान मंच उपक्रमांतर्गत 'इस्रो भेट' सहलीला गेलेल्या विद्यार्थ्यांपैकी दोन विद्यार्थिनींनी आपल्या अनुभवांचे कथन केले. मनपा शाळा क्रमांक २० च्या दीक्षा प्रजापती हिने तिच्या शब्दात सांगितलेल्या अनुभवाने उपस्थितांना सहलीचा व इस्रो भेटीचा आनंद मिळाला.

प्राथमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सुनील फापाळे सर यांनी या विद्यार्थिनींना बक्षीस जाहीर केले व मान्यवरांच्या हस्ते ते त्या विद्यार्थिनींना प्रदान करण्यात आले.

दोन दिवस चालणाऱ्या या विज्ञान प्रदर्शनात सर्व शाळांमधील विद्यार्थी व शिक्षकांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदवलेला आहे. त्यांच्या प्रयोगांचे व प्रकल्पांचे परीक्षण करण्याचे काम परीक्षकांकडून करण्यात येणार असून उत्कृष्ट प्रयोगांना ठाणे महापालिका शिक्षण विभागाकडून बक्षीसे दिली जाणार आहेत.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन ठाणे मनपा शाळा क्रमांक १२० चे शिक्षक सुरेश पाटील यांनी तर गट क्रमांक ८ च्या गटप्रमुख अनघा पालांडे यांनी सर्वांचे आभार मानले.

# उत्कर्ष महाविद्यालयात दिक्षांत समारंभ कार्यक्रम संपन्न

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील)**

वासिंद जवळील भातसई येथील समाज हितकारिणी संस्था संचलित उत्कर्ष महाविद्यालयात पदवी वितरण (दिक्षांत समारंभ) कार्यक्रम संपन्न झाला.

कला, वाणिज्य व विज्ञान (आय.टी) मधून पास झालेल्या विद्यार्थ्यांना लोहमार्ग पोलीस आयुक्त, मुंबई डॉ. रविंद्र शिसवे (भा.पो.से.) यांच्या उपस्थितीत हा पदवी प्रदान समारंभ पार पडला. या कार्यक्रमांसाठी आयुष आरोग्य मंत्रालय, राज्य कार्यक्रम




व्यवस्थापक डॉ. प्रशांत भोईर, गुन्हे अन्वेषण विभाग निवृत्त पोलीस उपअधिक्षक ओनिल मयेकर, गाडगेबाबा युनिव्हर्सिटी अमरावती, अभियांत्रिकी विभागाचे मोहन खोपे, जेएसडब्लयु कंपनी सीएसआर मुख्य विभागा चे कुणाल सिंह पवार, संस्थेचे अध्यक्ष अरुण वारघडे, सचिव रामदास शेळके, ठामपा माजी नगरसेवक नागेश जाधव, उद्योजक सुभाष सौखे, संस्था उपाध्यक्ष अनिल मानिवडे, सहसचिव अरुण भालेकर, सरपंच राजेंद्र म्हसकर, उपसरपंच भातसई दिलीप जाधव, प्राचार्य शेषराव मसुडकर, उपप्राचार्य अजित पोटे, पत्रकार पंडीत मसणे आदी प्राध्यापक, पालकवर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

दरम्यान, ज्या क्षेत्रात तुम्हाला करिअर साधायचा आहे त्या क्षेत्रात तुम्ही कठीण परिश्रम हाती घेऊन यशस्वी व्हा असे मार्गदर्शन डॉ. रविंद्र शिसवे यांनी विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमांचे प्रास्ताविक प्राचार्य शेषराव मसुडकर यांनी तर सूत्रसंचालन दिपिका काबाडी यांनी केले. यासाठी महा विद्यालयातील शिक्षक-शिक्षिकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिश्रम हाती घेतले होते.

# नव्या ठाणे स्थानकाच्या उभारणीतील वीज वाहिन्यांचा अडसर महिन्याभरात दूर होणार - पालिका आयुक्त




**ठाणे महानगरपालिकेच्या ठाणे-मुलुंड स्थानकादरम्यान प्रस्तावित नवीन उपनगरीय रेल्वे स्थानक या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयाची १४.८३ एकर जागा उपलब्ध होणेबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे आदेशानुसार स्टेशनकरीता आवश्यक असलेल्या जागेमध्ये असलेल्या ०५ महिला रुग्ण कक्षासाठी महापालिकेने नवीन वास्तू बांधून दिलेली असून त्याचा वापर सुरू झाला आहे.**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

**ठाणे :** ठाणे-मुलुंड दरम्यान होत असलेल्या नवीन रेल्वे स्थानकाच्या शेजारील उच्चदाब वीज वाहिनीच्या समस्येवर महिनाभरात तोडगा काढण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.

ठाणे आणि मुलुंडदरम्यान मनोरुग्णालयालगत ठाणे स्मार्ट सिटीतंर्गत नवीन रेल्वे स्टेशन बांधण्यात येत आहे. यामध्ये रेल्वे परिचलन क्षेत्रामधील ट्रॅक बांधणे, रेल्वे स्टेशन इमारत बांधकाम बांधणे आदी अनुषंगिक कामे रेल्वेकडून तर, परिचलन क्षेत्राच्या बाहेरील डेक, रॅम्प आदी अनुषंगिक कामे स्मार्ट सिटीच्या वतीने करण्यात येत आहेत. त्या कामाची पाहणी महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी नुकतीच केली. त्यावेळी, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपनगर अभियंता सुधीर गायकवाड, कार्यकारी अभियंता धनाजी मोदे, महावितरणचे अधिकारी आदी उपस्थित होते. या पाहणीदरम्यान या प्रकल्पाशी निगडित वेगवेगळ्या विषयांची आयुक्त राव यांनी माहिती घेतली. मध्य रेल्वेच्या मार्गावरून जाणाऱ्या उच्चदाब वीज वाहिनीमुळे काम थांबू नये, यासाठी आयुक्तांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना १५ डिसेंबरपर्यंत तात्पुरती उपाययोजना आणि महिनाभरात पर्यायी उपाययोजना काढण्याचे निर्देश दिले. तसेच, या वाहिनीचा टॉवर हटवून ही वाहिनी भूमिगत करण्याबाबत रेल्वे, महापालिका आणि महावितरण यांनी एकत्रित मार्ग काढावा, असेही आयुक्तांनी सांगितले.

नवीन उपनगरीय रेल्वे स्थानकाच्या कामामुळे बाधित होणाऱ्या झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याबाबतही तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देशही आयुक्त राव यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना दिले. या पाहणीदरम्यान, आयुक्त राव यांनी आतापर्यंत झालेले काम, पोहोच मार्गाचे काम, पूल आदी कामांचा आढावा घेतला. रुग्ण कक्ष स्थलांतरीत झाल्यामुळे नवीन उपनगरीय रेल्वे स्थानकाचे काम माहे ऑक्टोबर २०२३ पासून सुरु करण्यात आले आहे. या नवीन स्थानकाकडे जाण्यासाठी ०३ मार्गिका असून ०१ मार्गिका पूर्व द्रुतगती मार्गास जोडण्यात येणार आहे.

या स्थानकाच्या कामासाठी एकूण रु. ११९ कोटी ३२ लक्ष तसेच जोडरस्ते आणि Circulating Area विकसीत करणेसाठी रु. १४३ कोटी ७०लक्ष असा एकूण रु. २६३ कोटी ०२ लक्ष इतका खर्च येणार आहे. हे काम ठाणे स्मार्ट सिटी लिमिटेड अंतर्गत करण्यात येणार आहे.

नवीन स्थानकाचा फायदा प्रामुख्याने वागळे इस्टेट, घोडबंदर रोड परिसरामधील नागरिकांना होणार आहे. तसेच भविष्यात वाढणाऱ्या लोकसंख्येसाठी सदर स्थानक उपयुक्त ठरणार आहे.

# ठाण्यात अनधिकृत शाळांच्या संख्येत मोठी वाढ

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

**ठाण्यातील अनधिकृत आणि अधिकृत शाळांच्या संगनमताने होणारा शिक्षण क्षेत्रातील मोठा स्कॅम समोर आला आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात आजच्या घडीला हजारो विद्यार्थी हे अनधिकृत शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. मात्र या शाळांना गुणपत्रिका आणि दाखला देण्याचे अधिकार नसल्याने जी शाळा अधिकृत आहे आणि ज्या शाळेला शासनाचे अनुदान आहे, अशा काही शाळांच्या पटावर अनधिकृत शाळांच्या मुलांना दाखवून या सर्व मुलांना अधिकृत शाळेची गुणपत्रिका दिली जात असल्याचा प्रकार उघडकीस आले आहे. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मागे काही रक्कम अधिकृत शाळांना दिली जात असल्याची गंभीर बाब मेस्टा या संघटनेने उघड केली आहे. विशेष म्हणजे यासंदर्भातील पुरावे देऊनही शिक्षण विभागाच्या वतीने यासंदर्भात कोणत्याच प्रकारची कारवाई करण्यात आली नसल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.**



ठाणे महापालिका क्षेत्रात ठाणे महापालिका आणि जिल्हा परिषदेच्या शाळा असून यामध्ये आजच्या घडीला हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र अनधिकृत शाळांच्या प्रश्न आजही शिक्षण विभागाला निकाली काढता आलेला नाही. गेल्या काही वर्षात अनधिकृत शाळांची संख्या कमी होण्याऐवजी ती वाढली आहे. अनधिकृत शाळांविरोधात आवाज उठवणाऱ्या मेस्टा या संघटनेने ठाणे महापालिका क्षेत्रातील अनधिकृत शाळांची यादीच जाहीर केली आहे. यामध्ये ठाण्यात अनधिकृत शाळांची संख्या ही ४० वरून ७० च्या घरात पोहचली आहे. यामध्ये एकट्या दिव्यात सध्या ६५ अनधिकृत शाळा असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

अनधिकृत शाळांचा प्रश्न गंभीर असताना आता या शाळांच्या माध्यमातून होणारा स्कॅम हा वेगळाच गंभीर प्रकार असून यामुळे शिक्षण क्षेत्राचे पावित्र्यच धोक्यात आले आहे. आजच्या घडीला अनधिकृत शाळांमध्ये मोठ्या प्रमाणात डोनेशन भरून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र या अनधिकृत शाळांना गुणपत्रिका, बोनाफाईड आणि इतर कागदपत्रे देण्याचा अधिकार नाही. याशिवाय त्यांच्या गुणपत्रिकांना अधिकृत समजले जात नसल्याने अनधिकृत शाळांनी वेगळी शक्कल लढवली आहे. या अनधिकृत शाळा पोर्टलवर नसल्याने या स्कॅम उघड होत नाही. यासंदर्भातील पुरावे देखील संघटनेच्या वतीने देण्यात येऊनही अद्याप शिक्षण विभागाच्या वतीने कारवाई झालेली नसल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

**दिव्यातील शाळेत झालेला प्रकार निंदनीय**

दिव्यातील अनधिकृत शाळेत झालेला प्रकार निंदनीय असल्याचे सांगत या संघटनेच्या वतीने या सर्व घटनेचा निषेध करण्यात आला आहे. एका शाळेमुळे सर्व शाळा बदनाम होत असून अशा अनधिकृत शाळेवर कारवाई करण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. यावेळी अधिकृत शाळांच्या समस्या देखील संघटनेच्या वतीने मांडण्यात आल्या.

## 'एक देश, एक निवडणूक' ...

पान १ वरून ▶▶ संसदेच्या पटलावर मांडले जाऊ शकते.

मात्र, इंडिया आघाडीचा 'एक देश, एक निवडणूक' असणारा विरोध पाहता या विधेयकाला इतक्या सहजासहजी मंजुरी मिळण्याची शक्यता फारच कमी आहे. 'एक देश, एक निवडणूक' हा भाजपच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाकांक्षी विषय आहे. देशात तिसऱ्यांदा सत्ता आल्यानंतर भाजप 'एक देश, एक निवडणूक' हे धोरण पुढे नेईल, याबाबत अंदाज वर्तविले जात होते. हे अंदाज आता खरे ठरण्याची शक्यता आहे.

लोकसभेत 'एक देश, एक निवडणूक' विधेयकाला विरोध झाल्यास ते संसदेच्या स्थायी समितीकडे पाठवले जाऊ शकते. मात्र, सत्ताधारी एनडीए आघाडी 'एक देश, एक निवडणूक' विधेयकाला यंदाच्या अधिवेशनात मंजूर करवून घेऊ शकते का? हे पाहावे लागेल. या विधेयकावरुन संसदेत वादळी चर्चा होण्याची शक्यता आहे. या सगळ्यात काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील घटकपक्ष काय भूमिका घेतात, हे पाहावे लागेल. 'एक देश, एक निवडणूक' हे विधेयक संसदेत मंजूर झाले तरी त्याची अंमलबजावणी २०२९ पासून होईल.

**हिवाळी अधिवेशनातच 'एक देश, एक निवडणूक' विधेयकाला मंजुरी मिळणार?**

'एक देश, एक निवडणूक' विधेयकाला कॅबिनेटने मंजुरी दिल्याची माहिती समोर आलीय. आता सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात हे विधेयक, संसदेत सादर होणार असल्याची माहिती आहे. 'एक देश, एक निवडणूकी'बाबत रामनाथ कोविंद समितीच्या अहवालाला मंत्रिमंडळाने यापूर्वीच मंजुरी दिली आहे. 'एक देश एक निवडणुक' विधेयकाबाबत सरकारची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सरकारला एकमताने हे विधेयक मंजूर करून घ्यायचं आहे. त्यामुळे या विधेयकावर चर्चेसाठी ते विधेयक मोदी सरकार, सविस्तर चर्चेसाठी संयुक्त संसदीय समिती किंवा जेपीसीकडे पाठवू शकते.

स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात पंतप्रधान मोदींनी दिले होते संकेत

नरेंद्र मोदी आणि भाजपच्या नेत्यांनी यांनी आतापर्यंत अनेकदा 'एक देश एक निवडणूक' या धोरणाचा उल्लेख केला आहे. हे धोरण लागू होणे देशासाठी कशाप्रकारे फायदेशीर आहे, असे भाजपचे नेते वारंवार सांगताना दिसायचे. यंदा स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरुन केलेल्या भाषणातही मोदींनी One Nation One Election धोरणाचा उल्लेख केला होता. एक देश एक निवडणूक या निर्णयासाठी सगळ्याच राजकीय पक्षांनी पुढाकार घ्यावा. संपूर्ण ५ वर्षे राजकारण चालत राहायला नको. निवडणुका केवळ तीन ते चार महिन्यांत व्हाव्यात. एकाचवेळी निवडणुका होत असल्यानं विकासकामांना खीळ बसणार नाही. निवडणूक आयोजनचा खर्चही कमी होईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले होते.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले की, 'अत्यंत चांगला निर्णय घेण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्त्वाखाली सर्वांनी या निर्णयाला मान्यता दिली. यापूर्वी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या नेतृत्त्वात एक समिती स्थापन झाली होती. याच समितीनं हा अहवाल कॅबिनेटपुढे ठेवला होता. त्यानंतर कॅबिनेटनं याला मान्यता दिली. निश्चितपणे संसदेच्या सभागृहात पुढच्या काही काळात हे विधेयक मांडलं जाईल. त्यानंतर त्याची अंमलबजावणी होईल.'

## दिल्ली भेटीनंतर ...

पान १ वरून ▶▶ शिवसेना आमदारांमध्ये आहे. विशेषतः आधीच्या मंत्रिमंडळातील चार-पाच मंत्र्यांना या आमदारांचा विरोध आहे. या मंत्र्यांनी आधीच्या कार्यकाळात आमदारांची कामे केली नसल्याच्या तक्रारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करण्यात आल्या आहेत. त्यांच्याऐवजी नव्या चेहऱ्यांना संधी द्यावी, असे आमदारांचे म्हणणे आहे.

**ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्रिपद मिळविण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आग्रही**

ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्रिपद मिळविण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आग्रही असल्याची माहिती आहे. विधानसभा निवडणुकीत ठाणे जिल्ह्यात भाजपचे जास्त आमदार विजयी झाल्याने ठाण्याचे पालकमंत्रिपद भाजपच्या मंत्र्याकडे द्यावे, असा भाजपचा आग्रह आहे.

## शहापूर , मुरबाड टँकरमुक्ती...


पान १ वरून ▶▶ (नळयोजना विहिर स्त्रोत बळकटी करणासाठी), गॅबीयन बंधारे इ. सर्व उपाययोजना 'शिवजल सुराज्य अभियान' अंतर्गत राबवण्यात येणार आहेत. या सर्व कामांना नियोजित वेळेत पुर्ण करण्यासाठी श्रमदान, पाण्याचे सुयोग्य नियोजन करून गावातील पाणी पातळी वाढवण्यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.

दि. १० डिसेंबर, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२५ पर्यत अभियान कालावधी असून गाव/पाडयांमध्ये गटविकास अधिकारी यांनी संबधित बीट अभियंता लघुपाटबंधारे विभाग, पाणीपुरवठा विभाग, कृषी सहाय्यक, ग्रामसेवक यांना ग्रामपंचायत निहाय वेळापत्रकानुसार शिवार फेरी करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. गाव/ पाड्यातील पाण्याची पातळी, साठवण क्षमता, स्त्रोत, पावसाच्या पाण्याचे प्रमाण, पावसाचे पाणी साठवण सक्षमता व गावातील पाणी वापर यासंदर्भातील सविस्तर माहिती दि. २६ डिसेंबर, २०२४ पर्यंत जिल्हा परिषदेस सादर करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी परिपत्रकाद्वारे दिले आहेत.

जिल्हयात टँकरग्रस्त भागात वर्षभर ४० ते ४५ लिटर प्रत्येक व्यक्तीस पाणी पुरवठा सुरळीतपणे होण्यासाठी जिल्हा नियोजन, आदिवासी उप योजना, बिगर आदिवासी उप योजना, नावीन्य पुर्ण योजना, जलयुक्त शिवार, एमआरईजीएस तसेच जिल्हा परिषद सेस निधी इत्यादी विविध योजनाव्दारे मंजूर निधी तसेच ग्रामपंचायतस्तर पेसा, वितआयोग लोकसहभाग तसेच सीएसआर फंड इत्यादी मधुन स्त्रोत बळकटीकरण तसेच भूजल संवर्धनाच्या योजना लघुपाटबंधारे विभाग, पाणीपुरवठा विभाग, कृषी विभाग, एमआरईजीएस, ग्रामपंचायत व सामाजिक वनीकरण करून अभियान राबविण्यात येणार आहे.

अभियान यशस्वीपणे राबवण्यासाठी तालुकास्तरावरुन उत्कृष्ठ नियोजन, अमंलबजावणी व सहाय्य करणाऱ्या ग्रामपंचायतीस 'भूजल समृध्द ग्रामपंचायत' पुरस्कार तालुका व जिल्हास्तरावर निवड करून देण्यात येईल अशी माहिती ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून देण्यात आली.

या अभियानासाठी एकूण १० प्रकारे कामाचे नियोजन करण्यात येणार असून पुर्नः भरणाचे उद्दीष्ट व पाणी साठवण करण्यासाठी शहापूर तालुक्यात विंधण विहिरीवरील छता वरील पाऊस पाणी संकलन - ४५४ , रिचार्ज शाफट - ५०, गॅगीयन बंधारा - ५०, के.टी.बंधारा - १०, वनराई बंधारे/कच्चे बंधारे - ५०, सिमेंट नाला बंधराCNB - १५ नियोजित कामे असून त्याद्वारे भूजल पुनर्भरण ३३७ दश लक्ष लिटर तर साठवण १४५ दश लक्ष लिटर पाणी उपलब्ध करून देण्यासाठी कामकाज करण्यात येणार आहे. तर मुरबाड तालुक्यात विंधण विहिरीवरील छता वरील पाऊस पाणी संकलन - १३० , रिचार्ज शाफट - ७५, के.टी.बंधारा - ५, वनराई बंधारे/कच्चे बंधारे - ३५, सिमेंट नाला बंधरा CNB -७, युजीबी - ३ नियोजित कामे असून त्याद्वारे भूजल पुनर्भरण १४० दश लक्ष लिटर तर साठवण ८१ दश लक्ष लिटर पाणी उपलब्ध करून देण्यासाठी कामकाज करण्यात येणार आहे.



**दै.ठाणे जीवनदीप**
**आमदार निरंजन डावखरे यांनी ठाण्यातील रिक्षा प्रवासी व रिक्षाचालकांच्या विविध समस्यांसंदर्भात प्रादशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांची भेट घेतली. या वेळी कै. वसंतराव डावखरे रिक्षा-टॅक्सी चालक मालक संघाचे अध्यक्ष श्री. राजू सावंत, सरचिटणीस अरुण इघे यांच्यासह संघटनेच्या प्रतिनिधींची उपस्थिती होती. या बैठकीत रिक्षाप्रवाशांना सुविधा देण्याबरोबरच ठाण्यात प्री-पेड रिक्षा सुरू कराव्यात सीएनजी कीट टेस्ट व मीटर कॅलिब्रेशनबाबत होणारी अवास्तव शुल्क कमी करण्यासंदर्भात चर्चा झाली.**

# थकबाकीदारांचे पाणी बंद

## पाणी बिल थकबाकी वसुलीकरता ठाणे महापालिका आक्रमक

**१७८० नळ जोडण्या खंडित** | **१५२ मोटर पंप जप्त** | **५० पंप रूम सील**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

ठाणे : ठाणे महापालिकेची पाणी बिल थकबाकी वसुलीकरता पाणीपुरवठा विभागाने आक्रमक धोरण स्वीकारले आहे. पाणी बिल वसुलीसाठी मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेत संपूर्ण महापालिका क्षेत्रात आतापर्यंत १७८० नळ जोडण्या खंडित केल्या असून १५२ मोटर पंप जप्त करण्यात आले आहेत. तसेच, एकूण ५० पंप रूम सील करण्यात आले असून थकबाकी वसुलीसाठी ३३५४ थकबाकीदार ग्राहकांना नोटीस पाठवण्यात आल्या आहेत. या पाणी बिल वसुली अभियानात आतापर्यंत सुमारे ५९.४३ कोटी रुपयांची वसुली करण्यात आली आहे.

महापालिकेची पाणी बिल रक्कम सुमारे २२४ कोटी रुपयांच्या घरात आहेत. त्यापैकी, ७६ कोटी रुपये ही थकबाकी असून चालू वर्षाची बिल रक्कम ही १४८ कोटी रुपये आहे. पाणी बिलाची थकबाकी न भरल्यास नळ जोडणी खंडित करून पाणीपुरवठा बंद करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत. प्रभाग समितीतील पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्यांच्या नेतृत्वात पाणी बिल वसुलीची मोहीम राबवण्यात येत असून कारवाईत हयगय करू नये, असे त्यांना निर्देश देण्यात आले आहे. नागरिकांनी पाणी बिल वेळेत भरावे, तसेच थकबाकीदारांनी बील भरून पालिकेस सहकार्य करावे. अन्यथा नळ जोडणी खंडित करण्यात येईल, असे उपनगर अभियंता (पाणीपुरवठा) विनोद पवार यांनी स्पष्ट केले आहे. ही योजना ०१ सप्टेंबर २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत लागू राहील. वरील योजनेचा लाभ घेऊन थकीत व चालू पाणी देयकाची रक्कम पूर्णपणे भरून त्यावरील प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सवलत योजनेचा लाभ नागरिक घेऊ शकतील. या धोरणात्मक निर्णयापूर्वी ज्या घरगुती पाणी बिल धारकांनी पाणीपुरवठा देयके जमा केली असतील, अशांना सदरची सवलत योजना लागू असणार नाही. तसेच ही योजना व्यावसायिक संयोजन धारकांना लागू असणार नाही.

## भिवंडी शहरांसाठी स्टेम मार्फत होणारा पाणी पुरवठा बंद

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** स्टेम वॉटर डिस्ट्री. ॲन्ड इन्फ्रा. कंपनी प्रा.लि. ठाणे यांचेकडून दैनंदिन देखभाल व दुरुस्तीची कामे करणेकरीता वार शुक्रवार दि. १३/१२/२०२४ सकाळी ९.०० वाजे पासून ते वार गुरुवार दि. १४/१२/२०२४ सकाळी ९.०० वाजे पर्यत २४ तासांचा शटडाऊन घेण्यात येणार आहे. त्यामूळे भिवंडी शहरांसाठी स्टेम मार्फत होणारा पाणी पुरवठा बंद राहणार आहे व पुढील एक दिवस कमी दाबाने व कमी प्रमाणात पाणी पुरवठा होणार आहे. तरी ममता टाकी, चाविंद्रा गांव, पटेलनगर, बाला कंपाऊन्ड, फरीदबाग, वारक्या कंपाऊन्ड, संगमपाडा, कचेरीपाडा, ब्राम्हण आळी, कसारआळी, भावेनगर, कॉवडपाडा, आदर्शपार्क, अजयनगर, नझराना, गोकुळनगर, इंदिरानगर, कल्याणरोड, ठाणगेआळी, तीनबत्ती, शिवाजीनगर स्टाफ क्वॉटर्स, खडक गुरुचरणपाडा, अजमेरनगर, पटेल कंपा., शमानगर, साईनाथ सोसायटी, अंजूरफाटा, देवजीनगर नारपोली, विठ्ठलनगर, सोनीबाई, कंपा.. खलीक कंपाउन्ड, फैजान कंपा., मेहता कंपाउन्ड, रोशनबाग देऊनगर टावरे कंपाउन्ड, भंडारी कंपाउन्ड, नारपोली गांव, देवजीनगर, आय.जी.एम. पाण्याची टाकी, निजामपूरा, इस्लामपुरा, आमपाडा, अवचितपाडा, म्हाडा कॉलनी, शास्रीनगर, नेहरूनगर, मिल्लत १,२.३. नविवस्ती, कोंडाजीवाडी, चव्हाणकॉलनी, वेताळपाडा, बाळा कंपाउन्ड, खंडूपाडा, अंसार मोहल्ला, डोलारे पेट्रोलपंप, खोका कंपाउन्ड, कामतघर, अंजूरफाटा, जूनी ताडाली, नवी ताडाली, भाग्यनगर, हनुमान नगर, जयअंबे सोसायटी, कमला हॉटेल परीसर, श्रीरंग सोसायटी, गणेश सिनेमा, नवजीवन कॉलनी, समदनगर, कणेरी, न्यु कणेरी, गौरीपाडा, पद्मानगर, अशोकनगर, घुंघटनगर, कोटरगेट, बरफ गल्ली, कापआळी, इस्लामपूरा, उर्दू रोड, कुरेशनगर, लाहोटी कंपाउन्ड, भादवड, टेमघर येथे राहणाऱ्या नागरीकांनी नोंद घेऊन महानगरपालिकेस सहकार्य करावे, ही विनंती.

## मालमत्ता कर भरण्यासाठी भिवंडी महापालिकेची अभय योजना

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

लोकसभा व विधानसभा निवडणुकीत असंख्य कर्मचारी निवडणूक कामात गुंतून पडल्याने भिवंडी महापालिकेची मालमत्ता कर वसुली ही कमी राहिली आहे. यामुळे मालमत्ता कर वसुलीवर त्याचा परिणाम झाला असून मालमत्ता कर वसुली अधिक जोमाने व्हावी याकरिता दिनांक १२ ते १७ डिसेंबर या आठवड्याच्या कालावधीसाठी तिसऱ्यांदा अभय योजना राबविण्यात येत असल्याची माहिती महानगर पालिकेचे मा प्रशासक तथा आयुक्त श्री अजय वैद्य यांनी दिली. या अभय योजनेत थकीत मालमत्ता कर भरणाऱ्यास १००इ व्याजमाफी असणार असून या योजनेचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घेऊन आपल्या थकीत मालमत्ता करांचा भरणा करावा असे आवाहन मा. आयुक्त श्री अजय वैद्य यांनी केले आहे.

महानगरपालिकेचे या आर्थिक वर्षात १२५ कोटी मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्ट असून आता पर्यंत अवघी ३० कोटी रुपयांची वसुली झाली आहे.

१४ डिसेंबर रोजी आयोजित राष्ट्रीय लोक अदालती मध्ये तडजोड अंती मालमत्ता कर भरणेसाठी १० हजार हुन अधिक मालमत्ता धारकांना नोटीस बजावण्यात आली आहे.तर वारंवार सूचना देऊन ही मालमत्ता कर न भरणाऱ्या ११५ मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत.मालमत्ता कर हे महानगरपालिकेचे एकमेव उत्पन्नाचे स्त्रोत असल्याने भविष्यात मालमत्ता करामध्ये वाढ केली जाणार असून,तत्पूर्वी जी आय मापिंगच्या साहाय्याने शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण केले जाणार असून त्यामध्ये मालमत्तांना कर आकारणी बरोबर झाली आहे की नाही की काही मालमत्ता कर आकारणी मध्ये सुटलेल्या आहेत का हे देखील तपासता येणार आहे अशी माहिती आयुक्त अजय वैद्य यांनी दिली आहे.

**महानगरपालिका रडार वर हॉस्पिटल व खाजगी विवाह मंडप**

भिवंडी शहरातील अनेक खाजगी हॉस्पिटल हे निवासी संकुलात असून त्यांनी व्यवसायिक दराने मालमत्ता कर भरणे आवश्यक असल्याने पालिका प्रशासनाने विशेष मोहीम आखून या हॉस्पिटल ची पाहणी करून त्यांनी व्यवसायिक दराने मालमत्ता कर भरला आहे की नाही याची तपासणी केली जाणार आहे.तर शहरात मोकळया जागेत विवाह मंडप उभारून तेथे भाड्याने जागा दिली जात आहेत.या ठिकाणी कोणतीही परवानगी पालिका प्रशासन कडून घेतली जात नाही तर सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही काळजी घेतली जात नाही.कर्मचाऱ्यांच्या तपासणीत विविध प्रभाग समिती अंतर्गत ५४ ठिकाणी विवाह गार्डन मंडप उभरल्याचे आढळून आले असून त्यांना लवकरच नोटीस बजावून त्यांच्या कडून कर वसूल केला जाणार आहे अशी माहिती आयुक्त अजय वैद्य यांनी दिली आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी